SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR-416 004. MAHARASHTRA
PHONE : EPABX – (0231) 2609000, 2609089
FAX : 0091-0231-2691533, 2692333, 2693294
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर - ४१६ ००४. महाराष्ट्र
दूरध्वनी (ईपीएबीएक्स) २६०९००० (संलग्नता विभाग - २६०९०८९)
फॅक्स : ००९१-०२३१-२६९१५३३, २६९२३३३, २६९३२९४.
Website : www.unishivaji.ac.in E-mail : affiliation1@unishivaji.ac.in
B Accredited By NAAC (2009)

जा.क्र.संलग्नता/टे.१/युजीके/४६४८ दिनांक :- १५/०७/२०१४

प्रति,
मा. प्राचार्य,
संलग्न कला, वाणिज्य, विज्ञान, विधी,
शिक्षणशास्त्र, शारिरीक शिक्षण महाविद्यालये,

विषय : दि. १९/०९/१९९१ ते दि. २३/१०/१९९२ या कालावधीतील बिगर नेट/सेट अध्यापकांच्या स्थाननिश्चिती बाबत, तसेच शारिरिक शिक्षण संचालकांच्या स्थाननिश्चितीबाबत.

संदर्भ : जा.क्र. संलग्नता/टे.१/वंगार/६५ दि. ३०/०६/२०१४ चे या कार्यालयाचे पत्र

महोदय/महोदया,

आपणास आदेशान्वये कळविणेत येते की, संलग्नित अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील बिगर नेट/सेट अध्यापकांच्या सेवा नियमित करून त्यांना अनुषंगिक लाभ देण्याबाबत शासनाने निर्गमित केलेल्या शासन निर्णय दि. २७/०६/२०१३ च्या अनुषंगाने जे शिक्षक दि. १९/०९/१९९१ ते दि. २२/१०/१९९२ पर्यंत विद्यापीठ निवड समिती अथवा स्थानिक निवड समितीमार्फत नियुक्त केले असून महाविद्यालयाच्या/मान्यताप्राप्त शिक्षण संस्थेच्या सलग सेवेत कार्यरत आहेत अशा अंशकालीन व तासिका तत्त्वावरील अर्धवेळ, पुर्णवेळ शिक्षकांना नेट/सेट मधून सूट देण्यात आली आहे. त्यापैकी ज्या शिक्षकांना विद्यापीठामार्फत सुधारित (उभी) मान्यता दिल्या आहेत व ज्यांनी सुधारित (उभ्या) मान्यतेनुसार विद्यापीठाची चेंजीस-इन-टिचींग स्टाफ (आडवी मान्यता) घेतलेल्या आहेत अशा शिक्षकांची स्थाननिश्चिती तातडीने करावयाची आहे.

तसेच महाविद्यालयीन शारिरीक शिक्षण संचालकांच्या प्रश्नाबाबत शिवाजी विद्यापीठ शिक्षक संघ (सुटा) यांनी मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल केलेल्या याचिका क्रमांक ४९६२/२०१२ वर मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी दिलेल्या अंतरिम निकालानुसार संबंधित याचिकाकर्त्या शारिरीक शिक्षण संचालकांना सुधारित नियमित मान्यता देण्यात आल्या आहेत. अशा शारिरीक शिक्षण संचालकांनी सुधारित मान्यतेनुसार विद्यापीठाची चेंजीस-इन-टिचींग स्टाफ (आडवी मान्यता) घेतलेल्या आहेत अशा शारिरीक शिक्षण संचालकांची स्थाननिश्चिती तातडीने करावयाची आहे.

सबब, उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेवून दि. १९/०९/१९९१ ते २३/१०/१९९२ मधील शिक्षकांचे व याचिका क्रमांक ४९९२/२०१२ मधील शारिरीक शिक्षण संचालकांचे स्थाननिश्चितीचे प्रस्ताव जा.क्र. संलग्नता/टे.१/वंगार/६५ दि. ३०/०६/२०१४ च्या पत्रातील नियम व सूचनांनुसार दि. ३१/०७/२०१४ अखेर विद्यापीठ कार्यालयात पाठवून देण्यात यावेत.

कळावे,

आपला विश्वासू,

संचालक,
महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ,